स्थायी समितीच्या मंगळवार दिनांक 17–04–2012 रोजी दुपारी 03–30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. तिवारी दयाशंकर चंन्द्रशेखर | अध्यक्ष |
| 2. | सौ. वानखेडे अनीता प्रदिप | सदस्या |
| 3. | श्री. सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 4. | सौ. बहादुरे सरोज राजु | सदस्या |
| 5. | श्री. फुके परिणय रमेश | सदस्य |
| 6. | श्री. खान असलमखां रशीद खान | सदस्य |
| 7. | श्री. डोळस रविंद्र गोविंदराव | सदस्य |
| 8. | सौ. सुजाता विठ्ठलराव कोंबाडे | सदस्या |
| 9. | श्री. थूल राजू वासुदेवराव | सदस्य |
| 10. | श्री. हजारे पुरूषोत्तम नागोराव | सदस्य |
| 11. | सौ. जैस्वाल हर्षला संजय | सदस्या |
| 12. | सौ. अल्का अजय दलाल | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | सौ. कानतोडे भाग्यश्री गणेश | सदस्या |
| 2. | श्री. राजू ज्योतीरामजी लोखंडे | सदस्य |
| 3. | श्री. गुडधे प्रफुल्ल विनोदराव | सदस्य |
| 4. | सौ. प्रगती अजय पाटील | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. आर.झेड. सिद्दीकी, अपर आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 11 :— मे. कार्टेल आऊटडोअर ॲडर्व्हटाईजींग प्रा.लि., नागपूर यांना
{ प्रकाश विभाग } नागपूर महानगरपालिकेच्या पथदिव्यांच्या खांबांबर जाहिरातीचे अधिकार देण्याबाबत तत्कालीन स्थायी समिती ने ठराव क्र. ६४३ दि. १७.०२.२००९ अन्वये मे. कार्टेल आऊटडोअर ॲडर्व्हटाईजींग प्रा.लि. यांनी तत्कालीन मा. अध्यक्ष स्थायी समिती यांना निविदेतील काही अटी शिथील (उदा. निविदेपोटी दयावयाची वार्षीक रक्कम १२ ई.एम.आय. स्वरुपात व्याजाची आकारणी न करता देणे, जेस्टेशन पिरीयड वाढवून देणे इत्यादी) करुन निविदा मंजूर करावी अश्या आशयाच्या दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने विभागाने चर्चा करुन मा. आयुक्त यांनी योग्य निर्णय घ्यावा असा 'निर्णय' घेतला त्याअनुषंगाने विभागाने दिलेल्या प्रस्तावावर मा. आयुक्त यांनी मुख्यत्वे जेस्टेशन पिरीयड (कंत्राटदारास प्रिमीयम लायसन्स फि भरण्यापासून सूट मिळण्याचा म्हाणजेच किऑस्कस् लावण्याचा कालावधी) जो एक महिन्याचा होता तो चार महिन्यांच्या कालावधी करीता वाढवून देऊन तसेच एकमुश्त रक्कम भरण्याची अट द.सा.द.शे. १२% व्याजाच्या आकारणीसह शिथील करुन निविदेस मंजूरी दिली, त्यानुसार निविदाकारासोबत करारनामा करुन निविदाकारास कार्यादेश देण्यात आला मात्र निविदाकाराने दि. २.०२.२०१० ला तसेच दि. १२.०४.२०१० ला दिलेल्या पत्रामधे जेस्टेशन पिरीयड चार महिन्यांनी वाढवून दयावा, १२% द.सा.द.शे. दराने व्याज आकारण्याची अट रद्द करावी काही नविन साईटस्वर जाहीरातीचे हक्क मिळावे तसेच काही साईटस्वर पथदिव्यांचे खांब मध्यभागी लावून (व हे खांब पथदिवे इत्यादी लावण्याचा खर्च त्यांना नामपास देय असलेल्या रकमेतून वळता करण्यास किंवा यापोटी अधिकच्या कालावधीकरीता जाहिरात करण्याचे हक्क देण्याच्या अटीसह) त्यावर जाहीरातीचे हक्क देण्यास तसेच दि. ११.०५.२०१० च्या पत्रान्वये निविदेतील अट क्र. २९ (व विशेषतः २९.१०) अन्वये निविदेतील काही साईटस् वर त्यांचे किऑस्कस्मधील साहित्याची चोरी होणे, किऑस्कची अनैतीक तत्वांकडून मोडतोड होणे व यादृष्टीने साईटस् अव्यवहार्य (फिजीबल नाहीत) असणे या कारणांमूळे अश्या साईटस् ऐवजी नविन साईटस्ची मागणी केली आहे व साईटस् उपलब्ध नसल्यास निविदेतील साईटस् गाळण्यास (delete) विनंती केली आहे (ज्यामूळे त्यांना प्रिमीयम-लायसन्स फी भरण्यापासून सूट मिळेल) त्याअनुषंगाने मे. कार्टेल आऊटडोअर ॲडर्व्हटाईजींग प्रा.लि. यांचा -

१) जेस्टेशन पिरीयड (कंत्राटदारास वार्षीक प्रिमीयम व लायसन्स् फि चा भरणा करण्यापासून सूट देण्याचा कालावधी ज्यामधे कंत्राटदारास किऑस्कस् उभारण्याचा कालावधी समाविष्ट आहे.) १ फेब्रुवारी २०१० पर्यंत वाढवून देण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न तसेच

२) कंत्राटदारास वार्षीक एकमुश्त दयावयाची रक्कम १२ ई.एम.आय. नुसार देण्यास १२% द. सा.द.शे. व्याजाच्या आकारणीसह व पोस्ट डेटेड चेक्स् देण्याच्या अटी सह मंजूरी देण्याचा प्रश्न तसेच

३) कंत्राटदाराने निविदेत नमूद साईटस् अव्यवहार्य असण्यासंबंधी केलेले प्रतिपादन उदा. अनैतीक तत्वांद्वारे किऑस्कस्चे साहित्याची चोरी होणे - किऑस्कची मोडतोड होणे इत्यादी बाबत पोलीस कंम्प्लेंटस् व इतर सबळ पुरावे सादर करण्याच्या अधिन राहून अश्या साईटस्ऐवजी दुसऱ्या साईटस् देणे किंवा गाळणे यास कंत्राटदाराकडून नामपास ३५९५ पथदिव्यांच्या खांबावर जाहिरातीचे हक्कापोटी मिळावयाच्या एकूण रकमेत १०% पेक्षा जास्ट घट होणार नाही याचे अधीन राहून मंजूरी प्रदान करण्याचा व ज्या ठिकाणी रस्त्याच्या कडेला बसविलेल्या खांबाऐवजी रस्त्याच्या मध्यभागी पथदिव्यांचे खांब बसवावयाचा प्रस्ताव कंत्राटदाराने दिलेला आहे अश्या ठिकाणी असे खांब विभागाने दिलेल्या स्पेसिफिकेशन्स्नुसार नामपाच्या रजीस्टर्ड कंत्राटादाराकडून मे. कार्टेल आऊटडोअर ॲडर्व्हटाईजींग प्रा.लि. यांना बसविण्याची परवानगी देण्याचा व बसवून त्यावरील खर्च

कंत्राटदारातर्फे प्राप्त १२ ई.एम.आय. मधून एक वर्षाच्या कालावधीत समप्रमाणात (ईएमआय) वळता करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेऊन कायदयाच्या सल्लागाराचे अभिमत घेऊन स्थायी समितीकडे विषय ठेवण्यास स्थायी समिती ठराव क्र. ६६ दि. ३.०९.२०११ अन्वये मंजूरी प्रदान करण्यात आल्याचे अनुषंगाने नागपूर महानगरपालिकेच्या कायदयाचे सल्लागाराचे अभिमतासह विषय पुर्नविचारार्थ घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेउन कार्यकारी अभियंता, विद्युत यांच्या स्थायी समिती समोर झलेल्या निवेदनाप्रमाणे त्यांनी केलेल्या मौका तपासणी द्वारे विद्घुत खांबाची निविदेमधील संख्या १० टक्के एवढी कमी असल्याची वस्तुस्थिती आहे असे मान्य केले. म.न.पा.चे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने स्थायी समिती ठराव क्र. 643 दिनांक 17.02.2009 प्रमाणे निगम आयुक्त यांना जे अधिकार प्रदान केले होते त्या प्रमाणे त्यांनी घेतलेल्या निर्णया अनुरुप प्रशासनाने म.न.पा.चे आर्थिक नुकसान होणार नाही याची काळजी घेऊन निविदाकाराकडून बकाया राशीची वसूली करण्याबाबत नियमाप्रमाणे योग्य निर्णय घ्यावा.

तसेच कार्यादेशाची तिन वर्षाची मर्यादा व जेष्टेशन पिरीयड संपल्यावर उपरोक्त कंत्राट संपूष्टात आणावा व या संपूर्ण कामाची नविन निविदा काढावी यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 12 :– अंबाझरी स्मशानभुमी येथील विविध विकासांची कामे { लोककर्म विभाग } करण्यास्तव या कामाकरिता मे. लोटस कंन्ट्रक्शन यांची न्युनतम दरावरील रु. 3471955 /– ची प्राकलनीय राशीपेक्षा 5.51 टक्के कमी दराची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन अर्थसंकल्प 2012–13 म.न.पा. सभागृहाद्वारे मंजुर झाल्यावर नविन तरतुद कार्यालयाने प्रस्तावित करावी व प्रस्तावित विषय स्थयी समिती समोर सादर करावा या अटीसह हा विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 13 :– महानगरपालिकच्या मालमत्तेवर एकुण ८३ जाहिरात फलक { स्थावर विभाग } उभारुन त्यावर जाहिरात करण्याचे अधिकार देण्यासंबंधात प्राप्त झालेल्या रु. १,७४,५२,०९१.०० च्या निविदा खाली नमूद केलेल्या तक्त्याप्रमाणे मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयातील संपूर्ण निविदाकारांनी निविदेतील अटी व शर्ती चे अधीन राहुन ज्या साईटची जाहीराती साठी निवड केलेली आहे. व त्या प्रमाणे जे निविदा दर नोंदविले आहे त्या नमुद साईट मध्ये कोणताही तांत्रिक बदल करता येणार नाही या अटीवर एकमताने मंजूरी प्रदान केली.

तसेच जर यातील कोणताही निविदाकार काही स्थळावर जाहीरात फलक लावण्यास असमर्थता दर्शवित असेल किंवा स्थळामध्ये बदल करण्याची अनुमती मागत असेल अश्या निविदाधारका कडुन निविदेत नमुद असलेली निविदा दराची संपूर्ण रकमेची वसुली करावी व त्यानंतर स्थळात बदल करण्याचा निर्णय प्रशासनाने घ्यावा. परंतु अश्या बदलाचा निर्णय घेतल्यावर त्याची रितसर मंजूरी स्थायी समिती कडुन घेणे कार्यालयास अनिवार्य राहील.

जर या निविदेतील निविदाकार निविदेतील रक्कम भरण्यास असमर्थ झाल्यास अश्या कंत्राटदारास कायमचे काळया यादीत टाकण्यात यावे यांस सुध्दा स्थायी समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

| अ. क्र. | निविदाकाराचे नांव | एकुण जाहिरात फलक | साईट क्र. | ऑफसेट निविदा किंमत | प्राप्त एकुण महत्तम निविदा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. प्राईम साईस | ३१ | २, ३७, ३८, ५४, ५७, ६८, ६९, ७२, ७३, ७४, ७५, ७६, ७९, ८५, ८९, ९४, १०२, १११, ११२, ११६, १२८, १२९, १३४, १३५, १४२, १६६, १७७, १७८, १७९, १८६, २२५ | ४१८३४०० | ५९५५५३७ |
| २ | मे. ग्रेस अॅड स्पेस प्रा. ली. | २४ | ३, ४, २४, २५, २६, २७, २८, ३३, ४७, ४८, १०४, १३३, १४८, १४९, १५०, १५१, १५२, १६५, १७४, १९९, २०४, २२२, २२३, २२७ | २८८६००० | ६९९५४४८ |
| ३ | मे. कारटेल आउटडोअर अॅडव्हरटायजींग प्रा. ली. | १४ | १, ६, १६, २२, ६२, ७१, ९३, ११५, १४३, १४४, १५८, १५९, १७५, १८३ | १७४३७०० | १९९२१११ |
| ४ | मे. दि कन्सेप्ट | ६ | २९, ३९, ४०, ४९, १३६, १३७ | ११३८८०० | १६३२६६२ |
| ५ | मे. जेमीनी आउटडोअर अॅडव्हरटायजींग प्रा. ली. | ३ | ९, ९९, १९६ | २४९६०० | ३२३३३३ |
| ६ | मे. शार्प अॅडव्हरटायजींग ऐजन्सी | ४ | १५, १०७, १७०, २१६ | ३५१००० | ५१६००० |
| ७ | मे. ऐ. के. अॅडव्हरटायजींग ऐजन्सी | १ | १७१ | ३६४०० | ३७००० |
| एकुण | | ८३ | | १०५८८९०० | १७४५२०९१ |

ठराव क्रमांक 14 :— जकात नाका नं. ८ मौजा खापरी वर्धा रोड येथील { कार्य.अभि.(प्रकल्प) } विस्तारीकरणाच्या व आधुनिकरणाच्या कामाकरिता निविदा बोलविण्यात आल्या असुन, मे.एल.सी. गुरुबक्षानी यांची प्राकलनिय राशी रुपये २,५५,५५,५५३/— पेक्षा १.००: (एक प्रतिशत) कमी रुपये २,५२,९९,६८८/— दराची निविदा प्राप्त झाली आहे. तरी मे.एल.सी. गुरुबक्षानी यांची १.०० प्रतिशत कमी निविदा स्थायी समिती चे मंजूरीसाठी सादर प्रस्तुत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली..

खर्च साल २०११—१२ च्या आयव्यय पद क्र. ५७५ अंतर्गत करण्यात येईल

ठराव क्रमांक 15 :— वार्ड नं. ८८, गॅस गोडाऊन ते डॉ. पोफळी { कार्य.अभि.(स्लम) } आणि डॉ. संगतानी ते डॉ. मुकेश मिश्रा र्प्यंत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या असता मे. आर.एम. गोपलानी यांची प्राकलनिय दरापेक्षा १७.५० टक्के कमी दराची रुपये ३६,३९,००९/— ची निम्नतम निविदा प्राप्त आहे. या निविदेस तसेच रु. ४४,१०,९२०/— चे मुळ प्राकलनास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन अर्थसंकल्प 2012—13 म.न.पा. सभागृहाद्वारे मंजुर झाल्यावर नविन तरतुद

कार्यालयाने प्रस्तावित करावी व प्रस्तावित विषय स्थायी समिती समोर सादर करावा या अटीसह हा विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 16 :– कॉंग्रेसनगर अभिन्यासातील भुखंड क्र. '४१ अ' चे
{ स्थावर विभाग } वापरामध्ये विकास नियंत्रण नियमानुसार 'रहीवासी' ऐवजी 'व्यावसायीक व रहीवासी' वापर तसेच एका राहत्या घराऐवजी बहुमजली सदनिका असा बदल होत असल्यामुळे तसेच भुखंडाचे क्षेत्रफळ २५००.०० चौ. फुटापेक्षा जास्त असल्यामुळे म.न.पा. ठराव क्र. ३३६ दिनांक २५.११.२००८ मधील मुद्दा क्र. १४ नुसार संबंधीत भुखंड हस्तांतरणाची परवानगी देण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन म.न.पा. ठराव क्र. ३३६ दि. २५.११.२००८ नुसार अर्जदाराकडुन शुल्क आकारण्यात येऊन, वसुल करण्यात आले आहे. असे कार्यालयीन टिपनीत स्पष्ट नमुद केले आहे. म्हणुन ही स्थायी समिती भुखंड हस्तांतरणाची परवानगी देण्यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

तसेच २००८ पासुन ठराव क्र. ३३६ चे कार्यान्वीकरण झाल्यावर कार्यालयाने २५०० चौ. फुटाच्या वरील भुखंडाचे किती प्रकरणात असे शुल्क आकरण्यात आले. अशी किती प्रकरणे प्रलंबीत आहे व किती प्रकरणे स्थायी समितीकडे मंजूरीस्तव पाठविले, याची संपूर्ण माहिती १५ दिवसाचे आत स्थायी समिती समोर कार्यालयाने ठेवावी. असा समितीने एकमताने निर्णय घेतला.

अध्यक्षः— नामांतरणचा विषय लक्ष देण्यासारखा विषय आहे. एका माणसाने महापालिकेचा एक प्लॉट विकत घेतला आणि त्यानंतर महापालिकेकडे युझर चेंज करण्याकरिता अर्ज दिला. महापालिकेने मॅप सॅग्शन करते वेळेस पेनॉल्टीसह त्याच्याकडून पैसे घेवून घेतले. परंतु जेव्हा युझर चेंज करण्याकरिता आला त्यानंतर त्याला एनओसी देत नाही. कुंभारे साहेब या विषयावर बोलले की विषय स्थायी समितीसमोर आला पाहिजे. आता मा. सदस्य श्री.फुके यांनी सांगितले की नागपूर शहरात अश्या किती तरी प्रापर्टी आहेत ज्यांचा कमर्शियल वापर होत आहे. महापालिकेच्या स्थावर विभागाने याकडे लक्ष दिले पाहिजे. विभागाकडून त्वरित कार्यवाही करावी आणि त्यावर देखरेख करावी. त्यांचाही पर्दाफाश झाला पाहिजे. कोणताही व्यक्ति नियमित परवानगी घेण्याकरिता येतो त्यावेळेस ठरवून घेतले पाहिजे की हे काम किती कालावधीत झाले पाहिजे. एक वर्षापासून फाईल प्रलंबित आहे. त्यामुळे तो दुस–यांदा परवानगीसाठी येणार नाही. या विषयावर निर्णय घ्यावा आणि त्याला एनओसी दयावी. ठराव क्र. 326 प्रमाणे त्यावर निर्णय घेतल्यानंतर अशी किती प्रकरणे आपल्याकडे आलेली आहेत ती सर्व प्रकरणे स्थायी समिती समोर ठेवण्यात यावी या सुचनेवह या विषयाला मंजुरी देण्यात येते. या प्रकरणात ना हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे.

श्री. परिणय फुकेः— मा. अध्यक्ष महोदय, सिटीझन चार्टरच्या बाबतीत आपण काही तरी ठरविले पाहिजे. युझर चेंज करतांना एन.ओ.सी.चे काम किती दिवसात होईल हे ठरविले पाहिजे. प्रत्येक कामात खुप वेळ लागतो म्हणून नागरिक महापालिकेकडे येत नाही. 100 प्लॉट असतील आणि 10 वर्षात 10 वेळा विकले गेले असतील तरी त्याची माहिती आपल्याला राहत नाही. एखाद्या व्यक्तिने एनओसी करिता आपल्याकडे प्रामाणिकपणे अर्ज केल्यानंतर त्याला खुप चकरा माराव्या लागतात. या कामाकरिता काही तरी कालावधी ठरवून दिला पाहिजे.

अति.उपायुक्त(श्री.कुंभारे):— मा. अध्यक्ष महोदय, या प्रकरणात प्लॉन सबमीट केल्यानंतर त्याला रहिवासी वापराकरिता परवानगी दिली आहे. आता त्याला सदनिका बांधून कुटूंबाच्या बाहेरच्या व्यक्तिला सदनिका विकायच्या आहेत हा वेगळा विषय आहे.

अध्यक्षः— तफावत अशी आहे, की काही जागाची एनआयटीने लीज दिली आहे. एनआयटीने लीज दिल्यानंतर अशी तांत्रिक अडचण येत नाही. एनआयटीचे नियम आहेत. त्याप्रमाणे आपण काही करू शकतो काय? ज्यामुळे सामान्य माणसाला दिलासा मिळू शकेल. सामान्य माणसाला वारंवारं महापालिकेत चकरा माराव्या लागतात. त्याच भरपूर वेळ लागतो. खुप वेळ लागणार नाही याकरिता विभागाने सोपी पध्दत तयार करावी. स्थायी समितीच्या सदस्याने विषय मांडला. हा विषय फक्त स्थावर विभागापुरता मर्यादित नाही तर प्रत्येक विभागासाठी एक सिटीझन चार्टर तयार केले पाहिजे. कोणते काम किती दिवसात झाले पाहिजे. यासाठी काही ना काही ठरवावे लागेल. आज

अप्लीकेशन केल्यानंतर तीन–चार महिने होवूनही त्यावर निर्णय होत नाही. असेसमेंटच्या किती केसेस पेंडिंग आहेत या सर्व प्रकरणांत निर्णय घ्यावा. चार–पाच वर्ष लोटल्यानंतरही त्यावर निर्णय घेतला जात नाही. त्यावर काही ना काही निर्णय घेतला पाहिजे. हा विषय कुठे तरी संपला पाहिजे. प्रशासनाने एक चांगला सिटीझन चार्टर तयार केला पाहिजे. कोणत्या विभागात किती दिवसात काम होवू शकेल तसे जनतेला सांगता येईल. प्रशासनाने तीन महिन्यात नागरिकांची सनद चा कच्चा मसुदा समितीच्या समोर ठेवावा. नागरिकांच्या सनदीमध्ये फाईल किती दिवसात पुढे सरकेल आणि आठवडयाभरात किती समस्यांचे निराकरण केले जाईल. तीन महिन्यांनंतर समितीला तयार केलेला कच्चा मसुदा दिल्यानंतर त्याला सभागृहासमोर ठेवण्यात येणार आहे. आणखी एक विषय आहे, आपले सहा.आयुक्त समोर बसले आहेत. जेव्हा मी आढावा बैठक घेतली होती. त्यात ज्या प्रापर्टीचे असेसमेंट झालेले नाही. त्या प्रापर्टी मतदार यादीप्रमाणे शोधण्याचा प्रयत्न करावा असे निर्देश देण्यात आले होते. प्रत्येक झोनमध्ये हे काम सुरू आहे काय? सुरू नसल्यास सुरू करण्यात यावे. ज्या घरात किरायदार राहतात त्यामध्ये आपल्याला नवीन युनीट मिळून जातील. माझी एक सुचना अशी आहे, एमईसीबी किंवा स्पॅन्कोच्या ऑफीसमध्ये विद्युत पोलची जी यादी आहे ती मागून घेतली तर त्याच्यामार्फत किती लोकांनी घरे बांधली आहेत हे माहीत होवून जाईल. हा एक सोपा उपाय आहे. आपल्या काही अडचणी असतील, काही सुचना असतील तर त्या सांगण्यात याव्यात. नवीन प्रभाग झालेत त्यानुसार मा.सदस्य अविनाश ठाकरे त्यांनी असेसमेंट झालेल्या प्रापर्टीची नावे गोळा करून साफ्टवेअरमध्ये टाकले त्यामुळे त्यांना मतदार यादीतील लोकांची नावे बघायला सोयीस्कर झाले. आपणही रिव्हेन्यु आणण्याकरिता हा प्रयोग केला पाहिजे.

श्री.असलम खानः– मा. अध्यक्ष महोदय, प्रभाग पध्दती से 16 तारीख तक सफाई कर्मचारी देने का काम होने वाला था, उस का क्या हुआ ।

अध्यक्षः– प्रभागाच्या भौगोलिक रचनेप्रमाणे डिस्ट्रीब्युशन करून घेतले पाहिजे.

डॉ.गणवीरः– मा.अध्यक्ष महोदय, पेपरमध्ये करून ठेवले आहे.

अध्यक्षः– या सदनात निर्णय घेतला आहे की भौगोलिक रचनेप्रमाणे सफाई कर्मचा–यांची हजेरी लावून हेल्थ विभाग डिस्ट्रीब्युशन करू शकतो.

ठराव क्रमांक 17 :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

हस्ता /— हरीष दुबे

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

हस्ता /— दयाशंकर तिवारी

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर